# महाराष्ट्र वस्तु व सेवाकर विभाग

विशेष राज्यकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय,
३ रा मजला, नवीन इमारत, वस्तू व सेवाकर भवन, माझगांव, मुंबई - ४०० ०१०.

---

संदर्भ : १) कार्यालयीन आदेश क्र.विक्रीकर आयुक्त/२०१६/विविआ-विसआ नियंत्रण/ब-८०० दि.२२/०८/२०१६

२) कार्यालयीन आदेश क्र.विक्रीकर आयुक्त/२०१६/विविआ-विसआ नियंत्रण/ब-११ दि.०५/०४/२०१७

३) कार्यालयीन आदेश क्र. विकअ-२०१७ / आस्था-२/अविआ/१०० दि.०५/०७/२०१९

४) कार्यालयीन आदेश क्र. विक्रीकर आयुक्त/ २०१९/ विविआ-विसआ नियंत्रण / पुनर्रचना कक्ष/ धा.क्र ८२ दि.२२.०७.२०१९.

५) कार्यालयीन आदेश क्र. राज्यकर आयुक्त/ २०२०/ विविआ-विसआ नियंत्रण / पुनर्रचना कक्ष/ धा.क्र ८२ दि.३०.०९.२०२०

६) शासन निर्णय वित्त विभाग क्र. विकवि १२१९ / प्र. क्र ०२ / वि. प्र ४ दिनांक २५.०२.२०२०

## कार्यालयीन आदेश

क्र.विराआ / आस्था-3 / पुनर्रचना कक्ष / अति.मनुष्यबळ-आयुक्त कार्यालय / ब -631मुंबई. दि. 09 OCT 2020

1) अपर राज्यकर आयुक्त (व्हॅट) २, अपर राज्यकर आयुक्त (व्हॅट) 3 व अपर राज्यकर आयुक्त (व्यवसायकर) यांच्याकडे क्षेत्रीय कामकाजा व्यतिरिक्त धोरणात्मक विषय प्रदान करण्यात आले आहेत. त्यामुळे मुख्यालयातील या अपर राज्यकर आयुक्त यांच्याकडे क्षेत्रीय व धोरणात्मक अशा २ भिन्न जबाबदाऱ्या आहेत. या जबाबदाऱ्या प्रभावीपणे पार पाडता याव्या यासाठी या ३ अपर राज्यकर आयुक्त यांच्याकडे प्रत्येकी एक राज्यकर सहआयुक्त देण्यात येत आहे .

2) खालील तक्त्यात संबंधीत अपर राज्यकर आयुक्त यांच्याकडे देण्यात आलेले विषय व त्या संदर्भात राज्यकर सहआयुक्त यांनी अपर राज्यकर आयुक्त यांना कोणत्या कामात मदत करावयाची आहे या बाबत अनुक्रमे स्तंभ 2 व स्तंभ 3 मध्ये नमुद करण्यात आले आहे तर स्तंभ 1 व 4 मध्ये अनुक्रमे समन्वयक अपर राज्यकर आयुक्त व त्यांच्याकडे नेमुन देण्यात आलेले राज्यकर सहआयुक्त या बाबत नमुद करण्यात आले आहे :

| समन्वयक अपर राज्यकर आयुक्त | विषय | सोपविण्यात आलेल्या विषयांच्या अनुषंगाने करावयाची कामे | नव्याने नेमुन देण्यात आलेले राज्यकर सहआयुक्त (मुख्यालय) |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| अपर राज्यकर आयुक्त (व्यवसायकर) | १) प्रत्यक्ष प्रशासन व नियंत्रण<br>• ऊस खरेदीकर,<br>• कृषी आधारीत आयकर<br>• मोटार स्पिरीट करप्रणालीचे प्रशासन व नियंत्रण<br>• अंतर्गत लेखा परीक्षण<br>• अपिल आदेशांची छाननी (Scanning) (वस्तू व सेवाकर वगळून)<br>२)संपूर्ण राज्यासाठी असलेले व्यवसायकर कायद्याचे प्रशासन व नियंत्रण<br>३) संपूर्ण राज्यातील मूल्यवर्धित व केंद्रीय कर कायद्यांतर्गत निर्धारणा विषयक काम<br>४)संपूर्ण राज्यातील मूल्यवर्धित कर कायदा, केंद्रीय विक्रीकर कायदा व संलग्न कायद्यांतर्गत अपिले संदर्भातील काम (वस्तू व सेवा कर कायद्यांतर्गत ची अपिले वगळून)<br>५)संपूर्ण राज्यासाठी उस खरेदी कर कायदा, ऐषआराम कर कायदा व प्रवेश कर कायद्याचे प्रशासन व नियंत्रण | अ) राज्यस्तरीय आढावा घेणे<br>ब) अंतर्गत तसेच वाणिज्यिक परिपत्रकांचे प्रारूप तयार करणे<br>क) संगणक प्रणालीबाबत महाविकास तसेच संगणक प्रणाली तयार करण्यासाठी नियुक्त केलेल्या संस्थेबरोबर समन्वय ठेवणे<br>ड) आर्थिक बुद्धिसंपदा कक्षाशी समन्वय राखणे व सदर शाखेकडून वितरित झालेल्या कामकाजासंदर्भात देखरेख व नियंत्रण ठेवणे<br>इ) मुख्यालय १ तसेच विधीशाखेबरोबर समन्वय ठेवणे<br>फ) तसेच मा. राज्यकर आयुक्त यांनी वेळोवेळी सोपवलेली इतर कार्ये पार पाडणे | राज्यकर सहआयुक्त (मुख्यालय) ५ |
| अपर राज्यकर आयुक्त (व्हॅट) २ | १) संपूर्ण राज्यासाठी मुख्य समन्वयक अधिकारी<br>• सर्व कायद्यांतर्गत राज्यस्तरीय परतावा. (सर्व कायदे - VAT/ CST/GST सहीत)<br>• परताव्याचे अंदाजपत्र, | वरीलप्रमाणे | राज्यकर सहआयुक्त (मुख्यालय) ८ |

| समन्वयक अपर राज्यकर आयुक्त | विषय | सोपविण्यात आलेल्या विषयांच्या अनुषंगाने करावयाची कामे | नव्याने नेमुन देण्यात आलेले राज्यकर सहआयुक्त (मुख्यालय) |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| | • नोंदणी व मध्यवर्ती भांडार कक्ष (CRO)<br>२) संपुर्ण राज्यासाठी मुंबई विक्रीकर कायद्याचे प्रशासन व नियंत्रण | | |
| अपर राज्यकर आयुक्त (व्हॅट) ३ | संपूर्ण राज्यासाठी मुख्य समन्वयक अधिकारी<br>• वस्तू व सेवाकर कायद्यांतर्गत निर्धारणा व लेखापरीक्षण<br>• वस्तू व सेवाकर कायद्यांतर्गत अपिल प्रकरणांचा आढावा<br>• वस्तू व सेवाकर कायदा, मूल्यवर्धित कर कायदा व इतर अनुषंगिक कायद्यांतर्गत विवरणपत्रकांचा पाठपुरावा , विवरणपत्र कर कसूरदारांचा पाठपुरावा<br>• वस्तू व सेवाकर कायदा, मूल्यवर्धित कर कायदा व इतर अनुषंगिक कायद्यांतर्गत वसुलीचा पाठपुरावा | वरीलप्रमाणे | राज्यकर सहआयुक्त (मुख्यालय) १२ . |

3) स्तंभ क्र.4 मध्ये नमुद केलेल्या प्रत्येक राज्यकर सहआयुक्त (मुख्यालय) यांना प्रत्येकी २ राज्यकर उपायुक्त, २ सहाय्यक राज्यकर आयुक्त, ५ राज्यकर निरीक्षक व ३ कर सहायक हे मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

4) वर नमुद केलेले अतिरिक्त मनुष्यबळ हे मंजूर पदांच्या अंतर्गत समायोजनेतून अथवा अतिरिक्त कार्यभाराद्वारे उपलब्ध करुन देण्यात येईल. या बाबतचे आदेश संबंधीत आस्थापना शाखांमार्फत स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

या आदेशाची अंमलबजावणी तात्काळ करण्यात यावी.

(मा.राज्यकर आयुक्त यांच्या मान्यतेने)

(नितीन शालिग्राम)
राज्यकर सहआयुक्त (मुख्यालय) ४
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत,

1) विशेष राज्यकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य मुंबई
2) अपर पोलीस महासंचालक व मुख्य दक्षता अधिकारी , महाराष्ट्र राज्य मुंबई
3) सर्व अपर राज्यकर आयुक्त
4) सर्व राज्यकर सह आयुक्त
5) संबंधित आस्थापना २,४ व ५
6) निवडनस्ती
7) स्थळप्रत